# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १४ ◆ अंक ४५ ◆ अमरावती ◆ दि. ७ ते १३ मार्च २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## संयुक्त बैठका घ्या, समन्वय वाढवा!

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील स्थानिक पातळीवरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय राहावा, या दृष्टीने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, शिवसेना (ठाकरे) या तिन्ही पक्षांकडून आपल्याजिल्हा आणि तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांना मविआतील इतर पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठका घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.मंगळवारी यासंबंधी संयुक्तरीत्या एक पत्रक काढण्यात आले. महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय तोच आपल्या पक्षाचा विजय मानून एकत्रित काम करा, अशीही सूचना यामध्ये देण्यात आली आहे. जिल्हा तसेच तालुका पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी तातडीने ७ मार्चपर्यंत एकत्रित जिल्हानिहाय संयुक्त बैठका घ्याव्यात, अशी सूचना देण्यात आली आहे

# महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा हल्लाबोल

जळगाव : महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा आहे असं म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर कडाडून टीका केली. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जळगाव दौऱ्यावर आहेत. या ठिकाणी त्यांनी युवकांना संबोधित केलं. २०४७ च्या विकसनशील भारतासाठी मोदींना निवडून द्या असं आवाहनही त्यांनी आज उपस्थितांना केलं.

मी आपल्याशी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीबाबत चर्चा करायला आलो आहे. तरुण मित्रांनो तुम्ही विचार करत असाल की, उमेदवारांना निवडून आणण्यासाठी ही निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा निवडून आणण्यासाठी ही निवडणूक आहे. पण या गैरसमजात राहू नका. येणारी निवडणूक ही २०४७ मध्ये आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवण्यासाठी आहे. २०४७ मध्ये मंचावर खूप कमी लोकं असतील, पण मंचासमोर बसलेले सर्व तरुण सहकारी असतील. ही निवडणूक आपल्यासाठी आहे. ही निवडणूक भारताच्या तरुणांची आणि भारताच्या भविष्यासाठी आहे. भाजपला मत म्हणजे तरुणांच्या उज्ज्वल भविष्याला मत. भाजपला मत म्हणजे महान भारताच्या रचनेला मत. भाजपला मत म्हणजे मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवणं, असं अमित शाह म्हणाले.



सोनिया गांधी आणि मनमोहन सिंह यांचं सरकार होतं तेव्हा रोज बॉम्बस्फोट व्हायचे. दहशतवादी भारतात येऊन बॉम्बस्फोट करुन पळून जायचे. काहीच प्रत्युत्तर दिलं जायचं नाही. मोदीजी आले उरी आणि पुलवामामध्ये अतिरेक्यांनी हल्ला केला. दहाच दिवसात पाकिस्तानच्या घरात घुसून सर्जिकल स्टाईक आणि एअर स्ट्राईक करुन आतंकवाद्यांना संपवलं, असं शाह म्हणाले. काश्मीर आपला आहे की नाही? काश्मीर भारताचा भाग आहे की नाही? मोदींनी काश्मीरला भारताशी जोडलं. काँग्रेसने कलम ३७० ७० वर्षे लटकवत ठेवलं होतं. असं अमित शाह आपल्या भाषणात म्हणाले. महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा आहे. या रिक्षाची चाकं पंक्चर झाल्याने खिळखिळी झाली आहे. महाराष्ट्राला पंक्चर ऑटो विकास देऊ शकते का? तर नाही. त्यामुळे महाराष्ट्रात शिंदे फडणवीस सरकार महाराष्ट्रात उत्तम काम करतं आहे. असंही अमित शाह म्हणाले.

## अमरावती लोकसभा; काँग्रेसचे मुंबईत मंथन



अमरावती : लोकसभेची आचारसंहिता पुढील आठवड्यात लागण्याचे संकेत आहे, त्यामुळे आता सर्वच पक्ष सक्रिय झाले आहे. अशातच महाविकास आघाडीकडून अमरावती लोकसभेची जागा काँग्रेसच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता असल्याने काँग्रेसच्या इच्छुकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे उमेदवार आणि मतदार संघाबाबत काय तयारी सुरू आहे. हे जाणून घेण्याकरिता मंगळवारी टिळकभवन मुंबई येथील काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात अमरावतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रत्येकांची मते जाणून घेतली.

महाविकास आघाडीकडून अमरावती लोकसभा मतदारसंघ काँग्रेसला सुटणार असल्याचे वरिष्ठांकडून सुतोवात मिळत आहे. अद्याप महाविकास आघाडीकडून यादी प्रसिद्ध झाली नसली तरी जिल्ह्यात काँग्रेसची तयारी मात्र जोरात सुरू झाली आहे. अशातच तालुकास्तरावर बैठकांचे आयोजन केले जात आहे. परंतु, अद्यापही उमेदवार निश्चित नसला तरी काँग्रेसमधून दावेदारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे जिल्ह्यात काय स्थिती आहे. याचा आढावा घेण्याकरिता टिळक भवनात मंगळवारी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला माजीमंत्री सुनील देशमुख, आ. बळवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, किशोर बोरकर, मिलिंद चिमोटे, वैभव देशमुख, समीर जवंजाळ, मुन्ना राठोड, सागर कलाने, नीलेश गुन्हे, अंजली ठाकरे, जयश्री वानखडे, ओमप्रकाश झोड आदींची उपस्थिती होती. दरम्यान, सर्वांनीच अमरावती काँग्रेसलाच सोडण्याचा आग्रह धरला. यावेळी काही इच्छुकांनी देखील उमेदवारीकरिता आपली तयारी दर्शावली.

# जागतिक महिलादिनानिमित्त बचतगटांच्या उत्पादनांचे सायन्सकोर येथे प्रदर्शन

## ७ ते ९ मार्चदरम्यान जिल्हा परिषदेचे आयोजन

अमरावती : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोन्नती अभियान (उमेद) व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनानिमित्त बचतगटांच्या उत्पादनांचे जिल्हा प्रदर्शनाचे आयोजन ७ ते ९ मार्चदरम्यान सायन्सकोर मैदानात करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचा नागरिक, महिला तसेच सर्व वयोगटाच्या व्यक्तिनी लाभ घ्यावा व महिला आर्थिक सक्षमीकरणाच्या चळवळीला पाठबळ द्यावे, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी केले आहे. स्वयंसहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविणे याकरिता 'उमेद' व 'माविम' यंत्रणाद्वारे काम करीत आहेत. याअंतर्गत स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी स्वयंसहाय्यता समूहांच्या वस्तू विक्री व प्रदर्शनाचे तीन दिवसांचे आयोजन करण्यात येत आहे. या प्रदर्शनामध्ये महिलांच्या सर्वांगीण विकास, महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यकरिता विविध तज्ञांचे मार्गदर्शन, कार्यशाळा तसेच विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या प्रदर्शनात करण्यात येणार आहे. जिल्हा प्रदर्शनामध्ये जिल्ह्यातील उमेद व माविम अंतर्गत १०० पेक्षा अधिक स्वयंसहाय्यता समूह यात सहभागी होणार आहे. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहाद्वारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ व आकर्षक वस्तू नागरिकांना खरेदीकरिता ठेवण्यात येणार आहे. या प्रदर्शनमध्ये शाकाहारी ज्यामध्ये रोडगे, पिठल, भाकरी, बासुंदी, मांडे, पुरणपोळी इत्यादी स्थानिक व्यंजनाचा समावेश राहील. तर मासाहारीमध्ये चिकन, मटन, मांडे, ज्वारी, बाजरी भाकरी या विदर्भातील ग्रामीण भागातील मुख्य आकर्षण असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश आहे. तसेच स्वयंसहाय्यता समूहांकडून उत्पादित बांबूपासून विविध आकर्षक वस्तू प्रदर्शनमध्ये विक्रीकरिता मिळणार आहे.

### प्रदर्शनामध्ये विविध उपक्रमाचे आयोजन

- जिल्हा प्रदर्शनामध्ये रांगोळी स्पर्धा, रेसिपी स्पर्धा(मिलेटस), मर्दानी खेळ (मल्लखांब, स्वयं सुरक्षा, साहसी खेळ), खेळ पैठणीचा, लोकनृत्य, आदिवासी नृत्य, योग, मेडीटेशन, झुम्बा, संगीत संध्या, चित्रकला स्पर्धा, वैयक्तिक व ग्रूप नृत्य स्पर्धा इत्यादीचे आयोजन होणार आहे. तसेच महिलांचे आरोग्य व मानसिक ताण या विषयावर विविध तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन या प्रदर्शनीदरम्यान होणार आहे.








काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# लोकशाहीतील पारदर्शकता

*मतदानाच्या माध्यमातून उमेदवारास नाकारण्याचा हक्क मतदारास मिळाल्यानंतर लोकशाहीच्या संवर्धनाचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येऊ लागले आणि मतदार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा धागा ठरू लागला. पण, मतपत्रिकेतील नोटा नावाचा मताधिकार वापरून अन्य कोणत्याही उमेदवारास लोकप्रतिनिधी म्हणून निवडल्यानंतरही, मतदारांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची क्षमता एखाद्या उमेदवाराच्या अंगी असतेच असे नाही. लोकशाहीला अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक साधनशुचितेचा अवलंब निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीकडून होत नसेल, तर अपेक्षाभंगाचा जाब विचारून त्याला माघारी बोलावण्याची सोय नसल्याने, चुकीच्या उमेदवारास निवडल्याच्या चुकीची दुरुस्ती करण्याकरिता पुढच्या निवडणुकांची वाट पाहावी लागते अथवा कायदेशीर कारवाईतून असा उमेदवार अपात्र ठरविण्याच्या प्रक्रियेकडे नजरा लावून ताटकळत बसावे लागते. अनेकदा मतयारांच्या दृष्टीतून अपात्र असलेला लोकप्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून पराभूत होईपर्यंत अपात्र किंवा अकार्यक्षम ठरविणे शक्यच होत नसल्याने, प्रगल्भ लोकशाहीसाठी असे लोकप्रतिनिधी बहुधा मारकच ठरत असूनही मतदार मात्र हतबलच असतो. म्हणूनच, लोकप्रतिनिधीस परत बोलावण्याचा अधिकार मतदारांस मिळावा, यासाठी गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या संघर्षातून भविष्यात केव्हातरी सकारात्मक काही घडेल आणि लोकशाहीला बळ देणारे, निरपेक्षपणे काम करणारे, भ्रष्टाचार किंवा अनैतिक व्यवहारांचा कोणताही डाग नसलेले लोकप्रतिनिधी कायदेमंडळांत जनतेचे प्रतिनिधित्व करतील, या अपेक्षेने भारताची लोकशाही केव्हापासून भविष्याकडे नजर लावून बसली आहे. निवडून दिलेला उमेदवार अकार्यक्षम किंवा मतदारांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यास अपात्र वाटत असेल तर त्याला परत बोलाविण्याचा अधिकार मतदारांस असावा, अशी मागणी करणारे एक खाजगी विधेयक सुमारे सात वर्षांपूर्वी भाजपचे खासदार वरुण गांधी यांनी लोकसभेत मांडले होते. लोकांना आपला प्रतिनिधी निवडून देण्याचे अधिकार आहेत, तर त्यास परत बोलाविण्याचा अधिकारही लोकांना, म्हणजे मतदारास असावयास हवा; असा आग्रह त्याआधीही लोकनायक जयप्रकाश नारायण, सोमनाथ चटर्जी, अण्णा हजारे आदींनी धरला होता, लोकप्रतिनिधींनी स्वतःहूनच लोकांच्या अपेक्षांशी बांधिल राहून लोकशाही बळकट करण्याकरिता निरपेक्ष भूमिका बजावावी हेच त्यावरील उत्तर असल्याने, असे झाले तरच लोकशाही पारदर्शक राहणे शक्य असल्याचे मानले जाते. त्या प्रक्रियेची लोकशाहीला प्रामाणिक प्रतीक्षा असताना आता काही सकारात्मक अशी चिन्हे दिसू लागली आहेत, मतदारांनी नोटाचा अधिकार वापरून उमेदवारास नाकारण्याऐवजी, उमेदवारानेच निवडणुकीपासून स्वतःहून दूर होण्याचा निर्णय अधिक स्वागतार्ह आणि सुखावणारा ठरू शकतो, अन्यथा भ्रष्टाचाराचे, अनैतिक व्यवहारांचे किंवा अवैध मार्गाने अफाट संपत्ती गोळा केल्याचा आरोप असलेले अनेक उमेदवार राजकारणात वापरल्या जाणाऱ्या सर्व मार्गांचा अवलंब करून लोकप्रतिनिधी म्हणून मिरवितात आणि त्यास नाईलाजाने स्वीकारण्याची वेळ मतवारावर येते, निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांच्या गुन्हेगारी वगैरे पाश्र्वभूमीचा, अवैध संपत्तीचा किंवा अनैतिक वर्तणुकीचा बुरखा फाटला तरीही ते लोकशाहीचे आधारस्तंभ म्हणून वावरतात, हे टाळणे केवळ उमेदवारांच्या किंवा राजकीय पक्षांच्या हाती असल्याचे ओळखूनच वेऊ घातलेल्या निवडणुकीतील उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास त्याचा तपशील मतदारांसमोर मांडणे निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना आणि उमेदवारांसही बंधनकारक केल्याचा नेमका परिणाम आगामी निवडणुकीत मतनाना आधीच दिसणार आहे. याबरोबरच, सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्वाळ्यातूनही राजकारण स्वच्छ होणार असून लोकशाहीचा पारदर्शकपणा उजळणार आहे. संसद किंवा विधिमंडळातील कामकाज, भाषणे किंवा मतदानासाठी लाच घेणाऱ्या आमदार-खासदारांस कारवाईपासून बचावाची कोणतीही संधी राह नये, यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे ताजे निर्देश स्वागतार्ह ठरणार आहेत. कदाचित यामुळेच, आपल्या क्षमतांची मर्यादा ओळखून कोणी निवडणुकीच्या मैदानातून स्वतःहून माघार घेत असतील तर राजकारणातील नैतिकतेचे भविष्यदेखील उजळणे शक्य आहे. जनतेच्या दृष्टीने आपण निवडणूक लढविण्यास पात्र नसल्याने जोवर आपण निर्दोष ठरत नाही तोवर निवडणूक लढविणार नाही असा पवित्रा घेत भाजपच्या पहिल्या यादीतील दोन उमेदवारांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला आहे.*

# मानवी व्यक्तीमत्त्वाला आकार देतात ती पुस्तके




मानवी जीवनामध्ये पुस्तकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुस्तके वाचनातून आपल्याला चांगले काय, वाईट काय याचे दर्शन घडते. पुस्तकातून आपण चांगले-वाईट ओळखायला शिकतो. वाईटाचा त्याग केला पाहिजे आणि चांगले ते आत्मसात केले पाहिजे ही दृष्टी प्रत्येकाला पुस्तकातूनच मिळते. वाचनातून नवनिर्मिती साधता येते नव्हे तर साधल्या जाते. वाचनातून मानवी कल्पनाशक्ती वाढीस लागते. वाचनातून माणूस स्वप्ने पाहू लागतो व ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करतो. म्हणून स्व: व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुस्तके वाचन करणे खूप महत्त्वाचे आहे.

जसे दररोज उगवणारा सूर्य मानवी जीवनाला ऊर्जा प्रदान करतो. चंद्र शितल चांदणे देतो. डोंगरदर्यातून उगवणारी प्रत्येक नदी काठावरच्या गावाची तहान भागवते, धरती माणसासाठी अन्नाची निर्मिती करते, उगवलेली वनश्री, झाडे मानवी जीवनाची प्रत्येक गरज पूर्ण करते, पशु-पक्षी पर्यावरणाची शुध्दता राखतात, गुरे-ढोरे मानवाच्या कष्टात सहभागी होतात, वातावरणातील हवा मानवी श्वास जगवते, सारा आसमंत मानवी जीवनासाठी निस्वार्थी वृत्तीने दातृत्व जोपासतो, त्याचप्रमाणे पुस्तके सुध्दा मानवी जीवनाला सर्वांगाने समृद्ध करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. पुस्तके आपल्याला जगण्यासाठी प्रेरणा देतात, नवी दिशा दाखवतात. पुस्तके वाचनामुळे माणूस प्रगल्भ बनतो. यावरून माणसाच्या आयुष्यातील पुस्तकाचे अनन्यसाधारण महत्त्व आपल्या सहज लक्षात येईल.

उदाहरणार्थ, महात्मा फुले यांचे साहित्य आपण वाचले की शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती, शेतकर्यांवर होणारा अन्याय आपल्या लक्षात येऊ लागतो. त्यामुळे आपल्या अंत:करणात भावनांची मोठी खळबळ उडते. आपल्या अवतीभोवतीच्या परिस्थितीचे आपण निरीक्षण करतो. त्यात चांगले काय, वाईट काय आहे हे आपल्याला कळू लागते. म्हणून असे पुस्तक आपण कधीच विसरू शकत नाही. उलट असे पुस्तक आपण पुन्हा पुन्हा वाचत राहतो. अशा पुस्तकाच्या प्रत्येक वाचनाच्या वेळी आपल्याला नवीन दृष्टी मिळते, परिस्थितीचे अधिकाधिक चांगले ज्ञान मिळते. अशा परिस्थितीत काय केले पाहिजे आणि काय करता कामा नये यांचीही दृष्टी मिळते. मग आपण त्यानुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच पुस्तके आपल्याला चांगले जीवन जगायला शिकवतात. हे पुस्तकाचे फार मोठे महत्व आहे.

उत्तम स्वरूपाची पुस्तके आपल्याला सदोदीत भावनिक सोबत करतात. चांगल्या शब्दांची, वाक्यांची, परिच्छेदांची पुस्तके मानवी जिवनाला कलाटणी देतात, उभारी देतात, योग्य दिशा दाखवतात. पुस्तकरूपी संवादातून पात्रांच्या मनातील भावभावना आपल्याला कळायला लागतात. पुस्तकांमधील विविध घटना, प्रसंग यांची नाट्यमय मांडणी आपल्याला पाहायला मिळते. एकाच व्यक्तीचा स्वत:शी होत असलेला संवाद आपल्याला पुस्तकांमध्ये वाचायला, पाहायला मिळतो अशा संवादाला आपण 'स्वगत' म्हणतो. स्वगतमध्ये आत्मचिंतन, आत्मविश्लेषण, आत्मनिवेदन, आत्मटिका इत्यादी वैशिष्ट्य असतात. ही वैशिष्ट्ये मानवी जीवन सुकर, समृध्द करण्यास मदत करतात. म्हणजेच पुस्तक वाचनातून ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्ये, अभिरूची, अभिवृत्ती आदींची वृद्धी होऊन विकसित होते. चांगल्या पुस्तकातून विलक्षण अनुभव मिळतात. पुस्तके वाचल्यावर आपल्या मनावर काहीना काही परिणाम करत असतात. पुस्तकातील दु:खद घटना वाचकांचे मन हेलावून टाकतात, हृदय पिळवटून टाकतात. मग या परिस्थितीतील दु:खाची जाणीव व्हायला लागते नव्हे होते. ही अशी स्थिती वाईट आहे, ती तशी असता कामा नये, तर ती बदलली पाहिजे, असे विचार मनात डोकावतात. मग माणसे ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करतात. नवीन चांगली स्थिती आणण्याच्या विचारांना पाठिंबा देतात.

दया पवार यांच 'बलुत' हे आत्मकथनात्मक पुस्तक पाहा. यात दलित समाजाचे अत्यंत हीनदीन अवस्थेतील चित्रण रेखाटलेले आहे. हे पुस्तक वाचल्यावर वाचकांना दु:ख होते, संतापही येतो, मग जातीयता, धर्मांधता या तत्त्वांविरुद्ध त्याच्या मनात तिडीक निर्माण होते. याचा अर्थ 'बलुत' हे पुस्तक माणूसकीची बाजू घेते. गुलामगिरीविरुद्ध, अन्यायाविरुद्ध हे पुस्तक माणसाला लढायला प्रवृत्त करते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लिखित हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी ऍण्ड बॅंकिंग, द बुद्धा अँड द फ्युचर ऑफ हिज रिलिजन, बुद्धिझम अँड कम्युनिझम, बुद्धा, आंबेडकर एंड माक्र्स, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत आदि. ग्रंथामधून त्यांनी धर्मसुधारणा, समाजसुधारणा व शिक्षण याकडे प्रामुख्याने लक्ष दिले. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते हे बाबासाहेब जाणून होते. त्यांच्या ग्रंथ लेखनातून समाजाविषयीची तळमळ, सुधारणा व देशप्रेम दिसून येते. देश विकासात त्यांच भरीव कार्य आपले लक्ष वेधून घेते.

'झोपी गेलेला जागा झाला' या बबन प्रभूंच्या फार्स(प्रहसन) या इंग्रजी वांग्मयमध्ये मानवी व्यवहाराचा आणि जीवनातील सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी व्यक्तिमत्त्वातील शाश्वत सत्य हे योग्य व रंजक पद्धतीने मांडलेले या नाटकात आपल्याला पाहायला मिळते. माणसाच्या स्वभावाचे अंतर्बाह्य दर्शन यामध्ये आपल्याला पाहायला मिळते. 'मुलगी झाली हो!' या ज्योती म्हापसेकर लिखित पथनाट्यात पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे होणारे शोषण मांडलेले आहे. हुंडाबळी, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा प्रश्न, स्त्रियांवर होणारे शारीरिक व मानसिक अत्याचार, स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची आवश्यकता अतिशय प्रभावीपणे या पथनाट्यात आपल्याला वाचायला, पाहायला मिळते.

' व्हय मी सावित्रीबाई बोलते' सुषमा देशपांडे लिखित या एकपात्री प्रयोगामध्ये महात्मा फुले यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला आहे. त्यांच्या जीवनातील प्रसंग आणि घटनांची मांडणी सावित्रीबाई फुले यांनी प्रभावीपणे रेखाटली आहे.

म्हणजे अशी पुस्तके माणसाला चांगले जग निर्माण करण्याची प्रेरणा देतात. चांगली पुस्तके जीवनाचं वास्तव दर्शन घडवतात. माणसाला प्रगल्भ करतात. म्हणून प्रत्येकांनी दररोज कोणत्यानं कोणत्यातरी पुस्तकांच समजपूर्वक वाचन केलं पाहिजे.

**लेखन**
**संतोष मो. मनवर**
**जि.प.उ.प्रा.शाळा पंचाळा,**
**जि.प. वाशिम**

# लाईनमन दिनानिमित्त मोटार सायकल रॅलीतून वीज सुरक्षेचा संदेश




अमरावती : जनसामान्यांना लाईनमन म्हणून परिचित असणारा महावितरणचा जनमित्र हा महावितरण व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. परंतू विजेसारख्या अत्यंत जोखीम असलेल्या क्षेत्रात अनावधानाने झालेली चुकही क्षम्य नसते, त्यामुळे परिमंडलातील सर्व जनमित्रांनी तसेच बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनाशिवाय वीज यंत्रणेवर काम करू नये, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुळकर्णी यांनी केले. ४ मार्च हा परिमंडळात 'लाईनमन दिवस' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अमरावती शहर विभागातर्फे आयोजित मोटार सायकल रॅलीला त्यांनी झेंडी दाखवत या कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी अधीक्षक अभियंता सुनिल शिंदे, दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता आनंद काटकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती. मोटार सायकल रॅलीव्दारे वीज सुरक्षा, वीज संच मांडणी, वीज चोरी हा एक गुन्हा आहे या आशयाचे लोक जागर करण्यात आला.यावेळी मुख्य अभियंता म्हणाले की, विजेमुळे देशाच्या विकासाच्या चाकाला गती मिळाली आणि त्या चाकाला अत्यंत खडतर परिस्थिती वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम लाईनमन करीत असतात. एवढेच नाही तर दऱ्याखोऱ्यातून त्या शेवटच्या घरांनाही सुरळीत वीज पुरवठा देण्याचे काम लाईनमन करीत असतो. लाईनमनच्या एकंदरीत कामाची दखल घेत केंद्र शासनाकडून लाईनमन दिवस साजरा करून लाईनमनप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे, ही महावितरणसाठी आणि जनमित्रांसाठी अत्यंत आनंदाची आणि गौरवास्पद बाब आहे, असेही कुळकर्णी म्हणाले. अधीक्षक अभियंता सुनिल शिंदे यांनी आगामी काळात जिल्ह्यात पायाभूत तसेच वीज यंत्रणा विस्तारीकरण आणि सक्षमिकरणाची अनेक कामे होत आहे. त्यानुसार ती कामे ेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी कटीबद्ध राहण्याचे आवाहन केले.

अमरावती ग्रामीण विभागात कार्यकारी अभियंता अनिरूध्द आलेगावकर, अचलपूर वभागात संजय शृंगारे आणि मोर्शी विभागात संजय वाकडे यांच्या उपस्थितीत विविध ठिकाणी मोटार सायकल रॅली तसेच विविध कार्यक्रम घेऊन लाईनमन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. लाईनमन दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व जनमित्रांना सुरक्षेची शपथ देण्यात येऊन त्यांना विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात गौरविण्यात आले.यावेळी जनमित्रांच्यावतीनेही मनोगत व्यक्त करण्यात आले

# मोर्शी-वरूड उपजिल्हा रुग्णालयात नवीन ट्रॉमा केअर युनिट!

## नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासह प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन

शेंदूरजनाघाट : मोर्शी-वरूड उपजिल्हा रुग्णालयात नवीन ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करण्यात येणार आहे याशिवाय नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासह प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती आ.देवेंद्र भूयार यांनी दिली. मोर्शी -वरूड उपजिल्हा रुग्णालयात नवीन ट्रॉमा केअर युनिट, नवीन प्राथमिक तसेच उपआरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालयांना मंजुरी देण्याबरोबरच रुग्णालयांचे श्रेणीवर्धन, पदभरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात येणार





आहे. रुग्णालयांना वैद्यकीय चाचणी आणि अद्ययावत उपचार यंत्रणा उपलब्ध करावी,औषधांचा पुरवठा नियमित सुरु राहील, याची दक्षता घेऊन रुग्णांची कुठलीही गैरसोय होणार नाही, याची संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती आमदारांनी दिली. वरुड-मोर्शी तालुक्यातील जनतेसाठी नवीन रुग्णालय सुरू करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आमदार देवेंद्र भुयार यांनी पाठपुरावा केला. वरूड येथे १०० बेड महिला व बाल रुग्णालय, वरूड येथील ५० बेड उपजिल्हा रुग्णालयाचे १०० बेड मध्ये श्रेणीवर्धन करने. जरूड येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र. लोणी येथे ५० बेडचे ग्रामीण रुग्णालय. मोर्शी येथे १०० बेडचे ट्रामा केयर. खेड येथे ३० बेडचे ग्रामीण रुग्णालय, रिद्धपूर येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपळखंटु ा मोठा येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र वरुड उपजिल्हा रुग्णालय येथे आरोग्य कर्मचारी निवासस्थान मोर्शी उपजिल्हा रुग्णालय येथे आरोग्य कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणे आदी कामांचा समावेश आहे. सध्याअस्तित्वात असलेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये खाटांची संख्या वाढवून त्यांचे श्रेणीवर्धन करण्याची आमदारांच्या मागणीची दखल घेण्यात आली आहे.

## अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाची पिंगळाई गडावर बैठक

चांदूरबाजार : अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या मोर्शी तालुका शाखेच्या वतीने ७ मार्च रोजी ११.३० वाजता मोर्शी तालुक्यातील श्री क्षेत्र पिंगळादेवी गड गोराळा येथे पदाधिकारी बैठक व स्नेहभोजन कार्यक्रम आयोजित केला आहे.

या बैठकीत संघटना बांधणीवर चर्चा करणे, सन २०२४-२५ या वर्षासाठी तालुका कार्यकारणी निवडणे. पुढील वर्षासाठी संघटनात्मक कार्यक्रम ठरविणे. आणि अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे विषय चर्चिले जातील.

सभेला संस्थापक अध्यक्ष तथा केंद्रीय अध्यक्ष मनोहरराव सुने, केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक यावुल, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, विधी सल्लागार किरण भुते, जयश्री पंडागडे, कैलास बापू देशमुख, बाबाराव खडसे, माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, बाळासाहेब सोरगीवकर, अंबादास सीनकर, सागर सवळे, राजेंद्र ठाकरे, कांचन मुरके, उमेश भुजाडणे, ओमप्रकाश कुऱ्हाडे, राहुल कवीटकर उपस्थित राहणार आहे.

# धामणगावचे संशोधक डॉ. अमन अग्रवाल यांचा फ्रान्समध्ये डंका

**लाईटने चालणारे डिव्हाईस व सेंन्सर याबाबतचा शोध लावला**



धामणगाव रेल्वे : संशोधनामुळे संस्थेकडून शिकागो व कॅलिफोर्निया येथील जागतिक वैज्ञानिक परिषदेमध्ये भाग घेण्याची संधी डॉ. अमन राजेंद्र अग्रवाल यांना मिळाली आहे. संशोधनामुळे यूनिवर्सिटीकडून फान्स येथील जागतिक वैज्ञानिक संम्मेलनामध्ये दीड महिण्याकरीता जागतिक दर्जाच्या वैज्ञानिकांसोबत काम करण्याचे भाग्य त्यांना लाभले. अशी माहिती सोमवारला येथील जवाहर सहकारी सूतगिरणीचे सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. अमन राजेंद्र अग्रवाल यावेळी ते म्हणाले, उच्च शिक्षकानंतर मुंबई (कुलाबा) होमि जे. भाभा यांनी स्थापित केलेले मुलभूत संशोधन केंद्रामध्ये परीक्षा देवून प्रवेश मिळविला. तिथे जूनिअर रिसर्च फेलो.

पदवी मिळाली. ही पदवी परमानू उर्जा विभाग भारत सरकार द्वारा देण्यात आली. जे.आर.एफ.या पदवीचे शिक्षण घेत असतांना ३ वर्षाच्या कालावधीमध्ये संशोधनाच्या संदर्भामध्ये ऑप्टीक्स, फोटोनिक्स, ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स या संदर्भामध्ये विस्तृत अशी सखोल माहिती संशोधनाकरीता मिळाली. क्लीन रूममध्ये सेमी कन्डक्टर फॅब्रीकेशन याबाबतचे कौशल्य मिळाले. यामध्ये संशोधक डॉ. प्रो. अचंता वेणू गोपाल यांनी मला संपूर्ण मार्गदर्शन केले व त्यांच्याच मार्गदर्शनामध्ये तिथे काम करत असतांना आंतरराष्ट्रीय जरनल्स मध्ये ३ संशोधन पेपर प्रकाशित झाले. टी. आय.एफ. आर. मध्ये तीन वर्षाच्या संशोधनानंतर ऑप्टिक्समध्ये फार मोठे स्वारस्य निर्माण झाले. मास्टर्स साठी वायंट कॉलेज ऑफ ऑप्टिकल सायन्सेस(ओ.एस.सी.) ॲरिझोना विदयापीठ अमेरिका येथे प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. एम.एस.या पदवीकरीता शिक्षण घेत असतांना संशोधक व डॉ. प्रो. डाल्झिएल विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करण्याची संधी मिळाली. संशोधनाच्या कौशल्यामुळे पहिल्या वर्षानंतर मला पी.एच.डी. करीता प्रवेश मिळाला. पी.एच.डी. मध्ये शिक्षण घेत असतांना लाईटने चालणारे डिव्हाईस व सेंन्सर याबाबतचा शोध लावला. त्याचप्रमाणे अमेरिका येथे शिक्षण घेत असतांना २ डिव्हाईसचा नवीन शोध लावून त्याचे पेटेंन्ट रजिस्टर केले.

त्यापैकी दुसरे पेटेंन्ट अमेरिकी फेडरल गव्हरमेंन्ट संचालित (ठ. कर.ळ.) आंतरराष्ट्रीय जरनलर्स मध्ये प्रकाशित झालेले आहे. केलेल्या संशोधनाच्या कामामुळे संस्थेकडून शिकागो व कॅलिफोर्निया येथील जागतिक वैज्ञानिक परिषदेमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली. यावेळी पत्रकार परिषदेला जवाहर सहकारी सूतगिरणीचे उपाध्यक्ष विजय उगले, संचालक राजेंद्र अग्रवाल, पंकज गायकवाड, वसंत देशमुख व आदी उपस्थित होते.

# मातंग समाजातील उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण

**विविध संस्थांसाठी १०, तर प्रशिक्षणार्थ्यांसाठी १५ मार्चची मुदत**

अमरावती : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या अमरावती जिल्हा कार्यालयामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुटुंबीयांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी, यासाठी महामंडळाव्दारे प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे.

प्रादेशिक कार्यालयांतर्गत येणाऱ्या जिल्हा कार्यालयास एकूण १ हजार ६७ प्रशिक्षणार्थींचे उद्दिष्ट मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. याअनुषंगाने विविध संस्थांनी प्रशिक्षणार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्याच आवाहन महामडळाव्दार करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध संस्थांनी त्यांचे प्रस्ताव १० मार्चपर्यंत, तर प्रशिक्षणार्थ्यांनी १५ मार्चपर्यंत प्रादेशिक कार्यालय, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन अमरावती येथे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न तीन लाखांपेक्षा जास्त नसावे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने आधार कार्ड जोडलेले बँक खात्याचा तपशिल सादर करावा, याशिवाय इतरही काही निकष पूर्ण करणे उमेदवारांना बंधनकारक आहे. प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानुसार आवश्यक त्या परीक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील, असे आवाहन महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापकांनी केले आहे.

# ‘डॉन ३’ साठी कियारा अडवाणीने घेतले तब्बल ‘१२’ कोटी



*कियारा अडवाणी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. आपल्या अभिनयाने कियाराने अनेकांना भूरळ पाडली आहे. आत्तापर्यंत कियाराने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता लवकरच ती फरहान खान दिग्दर्शित ‘डॉन ३’ चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर रणवीर सिंहची प्रमुख भूमिका आहे. आता डॉन ३ साठी कियारा अडवाणीने किती पैसै घेतले याबाबतची माहिती समोर आली आहे. डॉन ३ चित्रपटात कियारा अडवाणी मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारणार आहे. सुरुवातीला या भूमिकेसाठी अभिनेत्री क्रिती सेनॉनचा विचार करण्यात आला होता. मात्र, आता कियाराच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे. डॉन ३ चित्रपटासाठी कियाराने तगडे मानधन घेतले असल्याची चर्चा सुरु आहे. बॉलीवुड हंगामाच्या बातमीनुसार कियाराने या चित्रपटासाठी तब्बाल १२ कोटी रुपये फी घेतली आहे. डॉन ३ साठी कियाराने आकारलेली फी ही आत्तापर्यंतच्या तिच्या मानधनापैकी सगळ्यात जास्त असल्याचे सांगण्यात येते. अभिनेत्रीने वॉर चित्रपटासाठी जेवढे मानधन घेतले होते त्याच्यापेक्षा दुप्पट मानधन तिने ‘डॉन ३’ साठी घेतले आहे.फेब्रुवारी २०२३ मध्ये डॉन ३ चित्रपटासाठी कियारा नावाची घोषणा झाली होती. फरहान अख्तरने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली होती. डॉन २ मध्ये शाहरुखबरोबर प्रियांका चोप्रा झळकली होती. त्यामुळे डॉन ३ मध्येही जंगली बिल्ली म्हणून प्रियांकाच दिसणार अशीही चर्चा होती. मात्र, शाहरुख व प्रियांकाने या चित्रपटातून काढता पाय घेतल्यानंतर रणवीर व कियाराच्या नावाची घोषणा करण्यात आली. डॉन ३ च्या माध्यमातून रणवीर व कियाराची जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.*

# ‘राजमाता जिजाऊ : सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार’ विषयावर व्याख्यान

## डॉ. प्रकाश पवार उलगडणार जिजाऊंचे अपरिचित पैलू

## ‘जाणीव प्रतिष्ठान’चे ११ मार्च रोजी आयोजन

अमरावती : 'राजमाता जिजाऊ सकल जनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या विषयावर 'जाणीव प्रतिष्ठान'तर्फे सोमवार, ११ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान अभियंता भवन, शेगाव नाका चौक, अमरावती येथे होणार आहे.

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार हे प्रमुख व्याख्याते म्हणून या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहे. राजमाता जिजाऊ यांच्या संदर्भात माहिती नसलेला माणूस महाराष्ट्रात

सापडणे शक्य नाहीच; मात्र तरी जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील विविध अंग, आजही आपल्याला अपरिचित असलेले पैलू डॉ. प्रकाश पवार जिजाऊप्रेमींसमोर उलगडून दाखवणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून साहित्यिक प्रा. डॉ.



अलका गायकवाड, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. डॉ. महेंद्र मेटे, विज्ञानाच्या शिक्षिका अंजली नाखले आदी उपस्थित राहणार आहे. जाणीव प्रतिष्ठानकडून नेहमीच वेगवेगळ्या भागातील विचारवंतांना आमंत्रित करून अमरावतीकरांना वैचारिक मेजवानी दिली आहे. त्यामुळे सर्व जिजाऊ व शिवप्रेमीनी या व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# लेक लाडकी योजनेसाठी १९ कोटी ७० लाखांचा निधी वितरित : आदिती तटकरे

मुंबई : मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात जन्माला आलेल्या मुलींना जन्मानंतर अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी १९ कोटी ७० लाखांचा निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, नवी मुंबईमार्फत ३६ जिल्ह्यांना १९ कोटी ७० लाख रुपये वितरित करण्यात आले. याबाबत जिल्हास्तरावर जिल्हानिहाय व तालुकास्तरावर कॅम्प आयोजित करून १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींना लाभ देण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे. आतापर्यंत जवळपास ३५ हजार प्रस्ताव जिल्हा कार्यालयात प्राप्त झालेले असून पुढील १५ दिवसांत तालुकानिहाय व जिल्हानिहाय कॅम्प आयोजित करण्यात येत असून पात्र लाभार्थींनी जवळच्या बालविकास प्रकल्प कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन तटकरे यांनी केले आहे. या योजने अंतर्गत पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलींना लाभ दिला जाईल.

मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार, सहावीत ७ हजार, अकरावीत ८ हजार तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार याप्रमाणे एकूण १ लाख १ हजार रुपये रक्कम दिली जाईल. ही योजना १ एप्रिल २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलीना लागू राहील, तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त नसावे, असेही महिला व बालविकास विभागामार्फत कळवण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापकांच्या वेतनाविषयी विधी न्याय विभागाचा अभिप्राय मागवा

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना

मुंबई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या दोन विद्यापीठांकडील प्राध्यापकांच्या वेतनाविषयी विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागवावा अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

या दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापकांना कन्हेरे, कदम समितीनुसार वेतन देण्याच्या प्रश्नाबाबत मंत्रालयात आज मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर,उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, यांच्यासह दोन्ही विद्यापीठांचे अधिकारी उपस्थित होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापकांना ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन देत असल्याचा मुद्दा सांगून मंत्री श्री. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जाते. हा वेतनातील दुजाभाव योग्य नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार स्थानिक निवड मंडळाने निवड केलेल्या उमेदवारांविषयी विद्यापीठाने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानुसार विद्यापीठांनी निर्णय घ्यावा. तसेच या प्राध्यापकांना वेतन देण्याविषयी विधी न्याय विभागाला सविस्तर व सकारात्मक माहिती सादर करुन अभिप्राय मागवावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

# राहुल नार्वेकरांचा ई-मेल हॅक, हॅकर्सनी आमदारांवरील कारवाईसाठी राज्यपालांना पाठविला ई-मेल

मुंबई : विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा ई- मेल आयडी हॅक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच हॅकर्सनी नार्वेकरांच्या ई-मेल आयडीवरून राज्यपाल रमेश बैस यांना ई-मेल पाठविला आहे. ज्यात विधानसभेत काम न करणाऱ्या आमदारांवर कारवाई करण्याची विनंती केल्याचे उघड झाले आहे. थेट विधानसभा अध्यक्षांचा ई-मेल आयडी हॅक झाल्याने विधिमंडळाच्या सायबर सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांच्या ई-मेल आयडीवरून सोमवारी राज्यपाल बैस यांना एक मेल आला. त्यात विधानसभेत नीट काम न करणाऱ्या आमदारांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. मात्र, यासंदर्भात राजभवनातून विधानसभा अध्यक्षांकडे खातरजमा करण्यात आली. त्यावर असा कोणताच ई-मेल आपण पाठविला नसल्याचे विधानसभा अध्यक्षांकडून सांगण्यात आले आणि हॅकिंगचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांकडून मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सायबर सेल या प्रकरणाचा तपास करत आहे.

नार्वेकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी चौकशी सुरू करण्यात आली आहे.



# न्यू हायस्कूल मेन शाळा परिसरात विद्यार्थ्यांमध्ये राडा

अमरावती : इयत्ता बारावीचा पेपर संपल्यावर दोन विद्यार्थ्यांमध्ये जुन्या कारणावरून वाद झाला. त्यापैकी एकाने त्याच्या साथीदारांना बोलावून दुसऱ्या विद्यार्थ्यांवर फायटर व चाकूने हल्ला केल्याची घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.



लालखडी येथील रहिवासी असलेला १८ वर्षीय विद्यार्थी जखमी असून त्याने तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार दुसऱ्या गटातील १८ वर्षीय विद्यार्थी व २० ते २५ वयोगटातील अन्य दोन तरुणांनी हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही विद्यार्थी जोग चौकातील न्यू हायस्कूल मेन या शाळेत शिकत असून, दोघांमध्येही वर्षभरापासून वाद सुरू आहे. सध्या इयत्ता बारावीची परीक्षा सुरू असल्याने सोमवारी त्यांचा शेवटचा पेपर होता. पेपर झाल्यावर तक्रारकर्ता विद्यार्थी त्याच्या मित्रांसह शाळेनजिकच पेपरबाबत चर्चा करीत होता. त्यावेळी आरोपी विद्यार्थी तिथे आला असता, तो रागाने तक्रारकर्त्या विद्यार्थ्यांकडे पाहत होता. त्यामुळे त्यांच्यात वाद झाला.

त्यावेळी आरोपी विद्यार्थ्याने कॉल करून अन्य दोन साथीदारांना बोलावून घेतले. त्या दोन युवकांनी चाकू व फायटरने तक्रारकर्त्या विद्यार्थ्यांच्या मित्रांवर हल्ला केला. त्यामुळे ते दोन्ही मित्र जीव वाचवून तेथून पळून गेले. आरोपींनी तक्रारकर्त्या विद्यार्थ्यांवरही हल्ला केला. त्यामध्ये तो जखमी झाला व त्याच्या डोक्यातून रक्त निघू लागले. त्यानंतर आरोपींनी तेथून पळ काढला. जखमीवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, शहर कोतवाली पोलीस पुढील तपास करीत आहेत

# स्पिन बॉलला डीआरएसने दाखविली गुगली

नवी दिल्ली: युपी वॉरियर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात वुमन्स प्रीमिअर लीग( २०२४) मधील ११ वा ामना खेळवला गेला. या सामन्यात आरसीबीच्या पोरींनी बाजी मारली अन युपीला २३ धावांनी मात दिली. आरसीबीकडून सांगलीच्या स्मृती मानधनाने ८० धावांची खेळी केली तर पेरीने ५८ धावा केल्या आहेत. आरसीबीने उभ्या केलेल्या १९८ धावांसमोर युपीला १७५ धावाच करता आल्या अन् आरसीबीने फायनलच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. अशातच आता या सामन्यात घेण्यात आलेल्या एका डीआरएसमुळे मोठा राडा झाल्याचं पहायला मिळतंय. प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने २० षटकांत तीन गडी गमावून १९८ धावा केल्या. बंगळुरूला प्रत्युत्तर देताना यूपीच्या संघाला पाचव्या षटकात पहिला धक्का बसला, जेव्हा किरण नवगिरे १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. त्यानंतर चमारी अटापट्टूला मैदानात आली. सामन्याच्या सातव्या ओव्हरमध्ये चमारी अटापट्टूला तिसरा बॉल खेळता आला नाही. ती एका बॉलवर एलबीडब्ल्यू झाली. त्यावेळी आरसीबीकडून करण्यात आलेल्या अपीलवर तिला लेग बिफोर बाद जाहीर करण्यात आलं. जॉर्जिया वेअरहॅम बॉलिंग करत असताना ओव्हरच्या तिसरा बॉल तिने लेग बॉल केला होता.












## गौरव प्रकाशन

'गौरव प्रकाशन' साप्ताहिकाच्या मालकीविषयी आणि इतर विशिष्ट माहितीबद्दल निवेदन

**फॉर्म ४ नियम ८ वा**

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६ (महाराष्ट्र) |
| **प्रकाशन कालावधी** | : | साप्ताहिक |
| **मुद्रकाचे नाव** | : | **गौरव बं. धवणे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती (महाराष्ट्र) |
| **प्रकाशकाचेनांव** | : | **गौरव बं. धवणे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती (महाराष्ट्र) |
| **संपादकाचे नांव** | : | **बंडुकुमार श्रीरामजी धवणे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६ (महाराष्ट्र) |
| मालक/ भागीदारांची | : | **बंडुकुमार श्रीरामजी धवणे** |
| नावे आणि पत्ते | : | गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६ (महाराष्ट्र) |

मी **बंडुकुमार श्रीरामजी धवणे**असे घोषित करते की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. ०७.०३.२०२४ **बंडुकुमार श्रीरामजी धवणे**
(प्रकाशक)


गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडुकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)